# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक १९.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून १०,९००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून २,९९५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२४७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,९५,३५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— खुनाचा गुन्हा उघड, जिवे ठार मारणारे आरोपींना अटक.**

फिर्यादी विजय आनंद मदन, वय ६३ वर्षे, रा. प्लॉट क्र. ६८, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, गिट्टीखदान, नागपूर यांचे प्लॉट क्र. ६४, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स येथील घरी मागील ०४ महिन्यापासून किरायाने एकटा राहणारा इसम नामे अजय किशोरीलाल श्रीवास, वय ४० वर्षे, रा. तेलीपुरा, सिताबर्डी, नागपूर, ह.मु.— फिर्यादीचे घरी किरायाने, यास दिनांक १६.०५.२०२६ चे १५.४० वा. चे सुमारास कोणीतरी अज्ञात आरोपीने, अज्ञात कारणावरुन, कोणत्यातरी धारदार शस्त्राने पोटावर वार करून, गंभीर जखमी करुन जिवानिशी ठार केले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व खात्रीशीर गुप्त माहीतीवरून गुन्हयातील आरोपींना निष्पन्न केले. प्राप्त माहितीवरुन आरोपी नामे १) संदेश अनिलराव भोसले, वय ३१ वर्षे, रा. गणेशपेठ वस्ती, नागपूर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने त्यांचा साथीदार आरोपी २) उंमग चंद्रशेखर दडवे, वय ४४ वर्षे, रा. पहाडीवाली माता मंदीरजवळ, वसंत डेअरी, पोलीस ठाणे गणेशपेठ, नागपूर याचेसह संगनमताने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना अटक केली असून, पुढील कार्यवाहीस्तव त्यांना गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (अती. कार्य. गुन्हे) नागपूर

शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. शुभांगी देशमुख, सपोनि. सचिन मते, गजानन चांभारे, पोउपनि. मनोज राऊत, सफौ. गजेंद्रसिंग ठाकूर, राजेश तिवारी, पोहवा. महेंद्र सडमाके, नरेश तुमडाम, विजय यादव, कमलेश गणेर, प्रविण शेळके, नापोअं. सुरेश तेलेवार, पोअं. सुनिल कुंवर, आशिष धंदरे, मंगल जाधव, संदीप पांडे, चापोहवा. कमलेश गहलोत, चापोअं. विवेक श्रीपाद यांनी, सायबर सेलचे पोउपनि. विवेक झिंगरे, पोहवा. चंद्रशेखर राघोर्ते, अनंता क्षिरसागर, पोअं. पराग ढोक, मिथुन नाईक, धिरज पंचभावे यांचे विशेष सहकार्याने केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :—घरफोडीचा गुन्हा उघडकीस, आरोपीस अटक.</u>**

दिनांक ११.०२.२०२६ चे १९.३० वा. ते दि. १७.०२.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. ०५, गुलमोहर कॉलनी, भारत गॅस गोडावून मागे, नरसाळा रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी वासुदेव नागोराव काळे, वय ६७ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे देवदर्शनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी कपाटाचे लॉक तोडून त्यातील रोख १५,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण ७४,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास व मिळालेलया खात्रीशीर माहितीवरुन आरोपी क्र. १) सागर उर्फ भांजा अशोक वर्मा, वय २३ वर्षे, रा. विजयनगर, शितलामाता मंदीर जवळ, पोलीस ठाणे कळमणा, नागपूर व २) स्वयंम शेखर रामटेके, वय २२ वर्षे, रा. प्लॉट क्र. १२६, अंबाझरी हिल टॉप, रेड्डी किराणा दुकान जवळ, अंबाझरी, नागपूर यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचे दागिने कि.अंदाजे ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (प्रभारी गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली आहे



**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :–** दिनांक १८.०५.२०२६ चे १७.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, ईतवारी, गांधी पुतळ्याजवळ, काशीकर वाड्याखाली, चावला अनाज भंडार दुकानाचे शटर समोरील ओट्यावर एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी विजय शंकरराव ताजने, वय ४८ वर्षे, रा. ईतवारी, गांधी पुतळ्याजवळ, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८६२४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ :–** दिनांक १८.०५.२०२६ चे ०१.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, घाट रोड, जैन डेअरी समोर एक अनोळखी महिला वय अंदाजे ४५ ते ५५ वर्षे, रंग सावळा, चेहरा–लांबट, बांधा सडपातळ, उंची ४ फुट ६ इंच, केस काळे पांढरे व लांब, अंगात क्रिम रंगाची कुर्ती व निळ्या रंगाचा पायजामा, लाल–पिवळ्या रंगाची ओढणी तसेच, पायात निळ्या रंगाची चप्पल घातलेले, अशा वर्णनाच्या महिला ह्या बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक महीलेची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद वर्णनाचे मृतक महिलेस ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गणेशपेठ येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. नुलगोंडावार ७५०७१०८४२७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**